<u>नि. फौ. ख. क्र.७३/२०१७</u> निशाणी ५४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – सैय्यद सादीक सैय्यद मुसा

वय – ४७ वर्षे, व्यवसाय – सुतार

पत्ता – तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि. ०९.०२.२०१७ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन,उरळ येथे बोलविले होते. मी पोलीसांसोबत स्वस्तिक अलंकार केंद्र, तेल्हारा येथे गेलो होतो, त्या ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष सोनार संदिप वासुदेवराव धरमकर यांचे कडुन एक सोन्याची चेन जप्त केली होती. माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला होता. पंचनाम्यावरील अ.क्र. १ वर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर सोनार संदिप वासुदेवराव धरमकर यांची सही आहे. त्यास **नि.क्र. ५५** देण्यात येते. त्यानंतर मी बजाज अलंकार केंद्र, तेल्हारा येथे गेलो होतो. त्या ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष सोनार आशिष बजाज यांचे कडुन एक सोन्याची अंगठी जप्त केली होती. माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला होता. पंचनाम्यावरील अ.क्र. १ वर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर सोनार आशिष बजाज यांची सही आहे. त्यास **नि.क्र. ५६** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती एच.बी.टिकार यांचे मार्फत</u>**

२. माझे फर्निचरचे दुकान असल्यामुळे मी सकाळ ते संध्याकाळ पर्यंत माझे दुकानात असतो. साक्षीदार पुन्हा सांगतात की, दुकानावर माझा भाऊ राहतो. मी पोलीस स्टेशनमध्ये काही कागदपत्रांवर सहया केल्या होत्या. पोलीसांनी मला कागदपत्रातील मजकुर वाचुन दाखविला नाही. संदिप धरमकार माझे मित्र आहेत. मी संदिप धरमकारच्या सांगण्यावरुन सहया केल्या. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी मजकुर वाचला होता. हे म्हणणे खरे नाही की, संदिप धरमकार कडुन सोन्याची चेन जप्त केल्याचे

मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी बजाज अलंकारवर गेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतीही जप्ती झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर कोणताही पंचनामा झाला नाही.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.12.20 17:39:52 +05'30'

बाळापूर. (श्रीमती डी. एम. पाटील)
दि. २०/१२/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.